DNS BANK
डोंबिवली नागरी सहकारी बँक लि.
(मल्टी-स्टेट शेड्यूल्ड बँक)
अर्थाला विश्वास मिळे अन् विश्वासाला अर्थ मिळे!

# अक्षय्य तृतीयेच्या शुभ मुहूर्तावर डोंबिवली बँकेच्या आधारवाडी, कल्याण शाखेचा शुभारंभ

**डोंबिवली - डोंबिवली नागरी सहकारी बँकेच्या 66 व्या आधारवाडी, कल्याण शाखेचा शुभारंभ अक्षय्य तृतीयेच्या शुभ मुहूर्तावर बुधवार दि. 18 एप्रिल 2018 रोजी होत आहे. डोंबिवली बँकेच्या आज रोजी 15 जिल्ह्यात 65 शाखा कार्यरत आहेत. आधारवाडी शाखा ही कल्याण शहरातील दुसरी शाखा असून 2018-19 या आर्थिक वर्षातील पहिल्या शाखेचा शुभारंभ होत आहे.**

**बँकेने आर्थिक वर्ष 2017-18 मध्ये मिश्र व्यवसायाचा 7700 कोटींचा टप्पा ओलांडला आहे. बँकेची आधारवाडी शाखा पवनधाम कॉम्प्लेक्स, अग्रवाल कॉलेजजवळ, गांधारी रोड, कल्याण (पश्चिम) येथे कार्यान्वित होत आहे. विविध आकर्षक ठेव व कर्ज योजनांचा लाभ घेण्यासाठी बँकेच्या या शाखेस सर्वांनी भेट द्‍यावी असे आवाहन बँकेचे मा. अध्यक्ष श्री. कर्वे व सरव्यवथापक श्री. परांजपे यांनी या प्रसिध्दी पत्रकाद्‍वारे केले आहे.**

**0-0-0-0**